जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४४५ दिनांक - १९/१०/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

# मॉर्निंग वॉक करणा-या नागरीकांचे हातातील महागडे मोबाईल हिसकावणा-या आरोपींकडुन १,८५,०००/- रु.चे ७ मोबाईल फोन जप्त

दि.२८/०९/२०२४ रोजी कात्रज तलावाकडुन उत्कर्षनगरकडे जाणाया रोडवर, कात्रज, पुणे फिर्यादी हे पायी वॉकींग करीत असताना त्यांचे मागुन आलेल्या दुचाकी गाडीवरील दोघांपैकी मागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे हातातील मोबाईल फोन हिसका मारुन जबरीने चोरुन नेला आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिले तक्रारीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.न ७९१/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०९(४) ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे **वरिष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील** यांनी गुन्हयातील आरोपींचा शोध घेणेबाबत तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. वरीष्ठांचे सुचनांप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे अज्ञात आरोपींचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार **मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे** यांना सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी **अझर आलम अन्सारी, वय २१ वर्षे, रा. पाण्याचे टाकीजवळ, गल्ली नंबर ५, कात्रज, पुणे** व विधीसंघर्षीत बालक यांनी केल्याचे खात्रीलायक बातमी मिळाली. त्यानुसार आरोपी अझर आलम अन्सारी यास अटक केली असुन बालकास ताब्यात घेण्यात आले आहे.

**अटके दरम्यान आरोपीकडुन १,८५,०००/- रु.चे ७ मोबाईल फोन जप्त करण्यात आले असुन** त्यांचे कडून भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील ०२, कोंढवा पोलीस स्टेशन कडील ०१ असे ३ गुन्हे उघडकीस आले असुन आरोपीकडुन मिळुन आले आणखीन चार मोबाईल फोनबाबत तपास चालु आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशीक विभाग, पुणे श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.राहुल आवारे, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.शरद झिने, तपास पथकाचे अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक समीर कदम, पोलीस उपनिरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार मितेश चोरमाले, अवधुत जमदाडे, सागर बोरगे, अभिनय चौधरी, सचिन सरपाले, शैलेश साठे, नामदेव रेणुसे, चेतन गोरे, महेश बारवकर, निलेश ढमढेरे, हनमंत मासाळ, मंगेश पवार, निलेश जमदाडे, सतिश मोरे, नवनाथ भोसले, निलेश खैरमोडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे यांच्या पथकाने केली आहे.


भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन
पुणे शहर
पुणे पोलीस